अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# ‘हिंमतबाज’ डॉ. बावसकर

वैद्यकीय क्षेत्रामध्ये कमिशनबाजीने कसा धुमाकूळ घातला आहे हे एका डॉक्टरने उघड केल्याने या वैद्यकीय क्षेत्राची लक्तरे आंतरराष्ट्रीय स्तरावर टांगली गेली. डॉ.हिम्मतराव बावसकर यांनी वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर लोकांना वेगवेगळ्या माध्यमातून कसे कमिशन मिळते आणि त्यामुळे सामान्य माणसाचा वैद्यकीय खर्च कसा अव्वाच्या सव्वा कसा फुगतो हेदेखील या निमित्ताने चव्हाट्यावर आले आहे. स्वत: बावसकर यांनीच वैद्यकीय क्षेत्रातला हा भ्रष्टाचार मुळासकट उखडून काढण्याचा निर्धार केला. परंतु, वैद्यकीय क्षेत्रातल्या तथाकथित नामांकित डॉक्टरांनी मौन बाळगून या भ्रष्टाचाराला आपला मूक पाठिंबा असल्याचे दाखवून दिले. आतापर्यंत आपण मेडिकलचे दुकान, वेगवेगळ्या पॅथेलॉजीच्या लॅबोरटरीज, स्कॅनिंग करणारे सेंटर, वेगवेगळ्या औषध कंपन्या आणि डॉक्टर्स यांच्यामध्ये पैसे लाटण्याची कशी एक साखळी आहे हे नुसतेच ऐकत होतो. ज्याला या वैद्यकिय क्षेत्रात ‘कट’ असा शब्द वापरला जातो. म्हणजे एखाद्या डॉक्टरने एखाद्या रुग्णाला रक्त किंवा लघवीची तपासणी करण्यासाठी पाठविले तर त्या पॅथॉलॉजीचा चालक-मालक त्या संबंधित डॉक्टरला काही रक्कम कमिशन म्हणून पाठवून देतो हिच रक्कम आधी रुग्णांकडून वसूल केलेली असते. इथपासून ते एखाद्या डॉक्टरने रुग्णाला मोठ्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याची शिफारस केली, तर या डॉक्टरला दणदणीत रकमेचा चेक घरपोच रवाना होतो. डॉक्टरांमध्ये उघडपणे चालणाऱ्या या करप्शनचा किंवा कट प्रॅक्टीसचा रुग्णाला मात्र जबरदस्त फटका बसत असतो. आज त्या भ्रष्टाचाराने रुग्णाच्या जीवालाही धोके पोहोचण्याचे अनेक प्रकार घडू लागले आहेत. गेल्या काही दिवसापासून डॉ.बावसकर यांनी वैद्यकीय क्षेत्रातल्या या भ्रष्टाचाराविरुध्द मोहिम उघडली त्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर मानाच्या समजल्या जाणाऱ्या लॅन्सेट या प्रसिध्द मासिकामध्ये घेतली गेली. मात्र अजूनही भारतातल्या डॉक्टरांचे किंवा सरकारचे डोळे उघडलेले दिसत नाहीत.

## वैद्यकीय माफियागिरी

ग्रामीण भागात असलेल्या महाडसारख्या परिसरात काही वर्षापूर्वी डॉ. बावसकर यांनी एका रुग्णाला कुठूनही एम.आर.आय. ही टेस्ट करून यायला सांगितले. त्याने ज्या ठिकाणी ही टेस्ट केली तिथल्या व्यक्तीने बावसकर यांना कमिशन म्हणून १२०० रुपयांचा चेक पाठवून दिला. तो चेक आता वैद्यकीय क्षेत्रातल्या भ्रष्टाचारालाच चेकमेट देणारा ठरला आहे. कारण त्यांनी हा चेक परत पाठवून आपला राग व्यक्त केला होता. त्या एमआरआय करणाऱ्या सेंटरला पत्र पाठवून रुग्णांकडून घेतलेल्या ४ हजार रुपयांच्या फीमध्ये १२०० रुपये कमी करण्याची सूचना केली आणि हे १२०० रुपये त्यासंबंधित रुग्णाला परत द्यावेत असेही सुनावले होते. या एकाच घटनेने डॉ. बावसकर अस्वस्थ झाले आणि त्यांनी या संदर्भात मेडिकल कौन्सिल इंडिया तसेच महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल यांच्याकडे तक्रार दाखल केली. परंतु, या दोन्ही संस्थांनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये चालणाऱ्या भ्रष्टाचाराला रोखण्याचे कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही किंवा बावसकर यांच्या प्रामाणिक प्रयत्नाचे जाहीर कौतुकही केले नाही. उलट आता आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आणि बावसकर यांच्या प्रयत्नाचे कौतुक केले गेले आहे. भारतातले वैद्यकीय क्षेत्र अशा प्रकारच्या गलिच्छ भ्रष्टाचाराने बरबटलेले आहे हे पुन्हा एकदा सिध्द झाले. सामान्य माणूस ज्या डॉक्टरांना देव मानण्याची तयारी ठेवतात, त्या डॉक्टरांमध्ये पैसे खाणारा दानव दडलेला आहे हे सिध्द होते. खालपासून वरपर्यंत म्हणजे साध्या फिजिशियनपासून ते सर्जनपर्यंत, मेडिकल दुकानापासून ते कॉर्पोरेट हॉस्पिटलपर्यंत रुग्णांना लुटणारी टोळी कशी कार्यरत आहे हे बावसकर यांच्यासारख्या डॉक्टरने दाखवून दिले. रुग्णांविषयी कोणतीही दया-माया किंवा मानवता शिल्लक न ठेवता या क्षेत्रात मेडिकल्स माफिया माजत असल्याचे या घटनेवरून आणखीनच स्पष्ट झाले.

## सरकारने लक्ष घालावे

पूर्वीच्या काळी अशी एक म्हण वापरली जात असे की, शहाण्या माणसाने कोर्टाची किंवा पोलीस स्टेशनची पायरी चढू नये. परंतु आता याच म्हणीमध्ये थोडा बदल करून असे म्हणण्याची वेळ येते की, कोणत्याही व्यक्तीवर रुग्णालयाची पायरी चढण्याची वेळ येऊ नये. कारण एकदा का दवाखान्याची पायरी चढली की, थर्मामिटरच्या पाऱ्याप्रमाणे फीदेखील वाढत जाते. एखाद्या कसायाच्या हातात एखादे गरीब जनावर सापडल्यावर तो जसा त्याला कापत सुटतो, तोच प्रकार हल्लीच्या दवाखान्यांमध्ये रुग्णाच्या बाबतीत घडतो. वेगवेगळ्या आजारामुळे हैराण झालेला रुग्ण मोठ्या आशेने डॉक्टरांकडे जातो. परंतु, त्याला कमीत कमी खर्चात बरे करण्याऐवजी जास्तीत जास्त खर्चात टाकले जाते. गरज नसताना तपासण्या करायला सांगितले जाते. आवश्यकता नसताना नको ती छोटी-मोठी ऑपरेशन्स केली जातात. मोठ्या हॉस्पिटलच्या भपकेबाजपणामुळे रुग्णांकडून अनावश्यक फी लाटली जाते. मोठमोठे डॉक्टर्स असूनही ज्यावेळेला रुग्णांची तब्येत गंभीर होते. त्यावेळेला हे मोठे डॉक्टर्स धावून येत नाहीत. अनेक ठिकाणी रुग्णांना प्राणाला मुकावे लागते. परंतु ज्याने या रुग्णाला या मोठ्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यासाठी कष्ट घेतलेले असतात. त्या डॉक्टरला मात्र तो रुग्ण जरी गेला तरी त्याला कमिशनचा कट मात्र घरपोच पाठविला जातो. लोकांचा एकेकाळी विश्वास असलेले हे क्षेत्र आज भ्रष्टाचाराने बदनाम झाले आहे. याबद्दल मोठमोठ्या पदव्या घेतलेल्या डॉक्टरांनादेखील जराशीसुध्दा खंत वाटत नाही. कारण त्यांना आपले स्टेटस् जपायचे असते. आपल्या शिक्षणावर झालेला खर्च वसूल करायचा असतो. आज प्रत्येक रुग्णालयात प्रत्येक डॉक्टर मनमानी पध्दतीने फी वसूल करतो. सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही. कोणती पदवी घेतलेल्या डॉक्टरने आणि कोणत्या दर्जाच्या हॉस्पिटलमध्ये किती फी घेतली जाईल हे सरकारने निश्चित करायला हवे. रुग्णांची लूट करणाऱ्या वैद्यकीय क्षेत्रातल्या माफियाराजला कठोरपणे रोखण्याची वेळ आली आहे.